# विद्युत विभाग
# ठाणे महानगरपालिका,ठाणे
## <u>संक्षिप्त माहिती</u>

| | |
|---|---|
| १. विभागाचे नांव | विद्युत विभाग |
| २. विभागाचे कार्यक्षेत्र | संपूर्ण ठाणे महानगरक्षेत्र |
| ३. विभागांतर्गत कार्यालय | सर्व प्रभाग समिती |
| ४. खात्यांचा आकृतीबंध | मा. आयुक्त, |

अतिरिक्त आयुक्त,

उपनगर अभियंता(वि)

कार्यकारी अभियंता(वि)

उप अभियंता(वि)

कनिष्ठ अभियंता(वि)

ए.सी ऑपरेटर,
सहाय्यक ए.सी.ऑपरेटर
बिगारी

टेलिफोन ऑपरेटर

वायरमन
लाईटचेकर
बिगारी

कार्यालयीन अधिक्षक व
भांडारपाल/लेखापाल,

"अ"वर्ग लिपिक
लिपिक
टंकलेखक
शिपाई
बिगारी

५. विभागाची कामकाज पध्दती

ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पदपथावर आवश्यकतेनुसार नविन दिवे लावणे व त्याची देखभाल करणे. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा , ठामपा शाळा इमारती, राम गणेश गडकरी रंगायतन, आरोग्य केंद्रे, मुख्य कार्यालय,प्रभाग समिती कार्यालये, उद्याने, दादोजी कोंडदेव स्टेडीयम, मार्केट इत्यादींची विद्युत संच मांडणी दुरुस्ती व देखभाल करणे.तसेच त्यांची विजेची देयके अदा करणे. वाहतुक नियंत्रक सिग्नल यंत्रणा बसविणे व दुरुस्ती करणे.

२..

| | |
|---|---|
| ६. कोणकोणत्या कायदाव्दारे व नियमाव्दारे त्या बाबतची संक्षिप्त माहिती. | मुंबई प्रांतिय महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४९,२५१व २५२ |
| ७. विभाग/खात्या मार्फत राबविण्यात येणारे विशेष उपक्रम तसेच नव्याने सुरु करण्यात आलेले उपक्रम या बाबतची माहिती | १. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे १८० टन क्षमतेचा सौर ऊर्जेवर आधारीत मध्यवर्ती वातानुकुलन यंत्रणा बसविण्याचे काम प्रगती पथावर आहे.<br>२. थर्मल स्टोरेज तंत्रज्ञानावर आधारित वातानुकुलन यंत्रणा राग गणेश गडकरी रंगायतन येथे बसविण्याचे काम सुरु आहे.<br>३. ठाणे महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकिय भवनाच्या इमारतीवर ५० कि.वॅट क्षमतेची सौर फोटो व्होलटाइक यंत्रणा बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.<br>४. ओल्या कचा-यापासून बायो मिथेन गॅस निर्मिती करून त्यावर विज उत्पादन करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.<br>५.शहराच्या स्ट्रीटलाईट यंत्रणा ही ऊर्जा कार्यक्षम करण्यात येत आहे.<br>६. अकराच्या पंचवार्षिक योजने अंतर्गत ठाणे शहराची "सौर शहरीकरण " करण्यासाठी मंजूरी प्राप्त झालेली आहे. |
| ८. विभागांतर्गत होणा-या कामकाजांवर नियंत्रण ठेवण्यासाठी केली जाणारी कार्यवाही. | उपनगर अभियंता यांच्या नियंत्रणाखाली तसेच कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांच्या देखरेखेखाली नविन कामांची आखणी व त्यावरील देखभाल, तसेच महापालिकेच्या सर्व विद्युत संच मांडणींची निगा व देखभाल |

| | |
|---|---|
| ९. विभाग प्रमुखांकडून घेण्यात येणा-या बैठकी बाबतची माहिती. | सर्व प्रभाग समितींचे साप्ताहीक , पाक्षीक व मासिक आढाव बैठक घेण्यात येते |
| १०.अभिलेखा ठेवण्याची कार्यपध्दत | सहा बंडलांन्वये |
| ११.विभागाकडे नागरीकांकडून प्राप्त होणा-या तक्रारींची संख्या व तक्रारीं स्वरुप निपटा-यासाठी केलेली उपाय योजना | ठामपा क्षेत्रातील प्राप्त झालेल्या विद्युत विभागासंबंधी सेवांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्राप्त परिस्थितीचा अभ्यास करून केलेल्या तक्रारींचे निवारण करण्यात येते. यामध्ये लोकशाहीदिन, माहितीचा अधिकार यांचाही समावेश आहे. |
| १२. विभागाचे संगणकीकरण करावयाची उपाययोजना | प्रक्रिया सुरु आहे. |
| १३.वार्षिक अंदाजपत्रक | सोबत जोडले आहे. |